REGISTERED No. B. 343




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । — कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख २४ मार्च १९४८ अंक ११


## दि रत्नाकर बँक, लि.

स्थापना : १९४३

**—: शाखा :—**

( १ ) कोल्हापूर, ( २ ) शाहुपुरी, ( ३ ) सांगली, ( ४ ) मिरज, ( ५ ) जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | १०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | १८,००,००० |

—अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात—

**नामदार बी. बी. पाटील** B. A., LL. B., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट. चेअरमन

**श्री. गं. सि. चौगुले.** M. L. A. कोल्हापूर व्हा. चेअरमन

**एल. एन्. शहा.** B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,११,८५० रु. |
| भरलेलें भांडवल | ७४,१७० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १००,००० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | १०,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.**

अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा.

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें










## विविध माहिती

**इंग्लंड-हॉलिवुड वांधा मिटला**—गेल्या वर्षी डॉलरची बचत करण्यासाठी म्हणजे अमेरिकन चित्रपटांची आयात थोपविण्यासाठी त्यांवर ७५%जकात बसविली. नव्या चित्रपटांच्या निर्मितीस अजिबात बंदी करून अमेरिकेनें प्रत्युत्तर दिलें. सात महिने असे गेल्यानंतर, इंग्लंडलाच मिळतें घ्यावें लागून अमेरिकन चित्रपटांवरील जकात रद्द करावी लागली आहे. येतीं पहिलीं दोन वर्षे दरसाल १ कोटी, ७० लक्ष डॉलर्स ह्या चित्रपटांचे पोटीं इंग्लंडला अमेरिकेस द्यावे लागतील, असें आतां ठरलें आहे.

**रिझर्व्ह बँकेच्या शेअरचे १५० रु. द्या**—रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण केल्यास भागीदारांना प्रत्येक १०० रु. च्या भागास किमान १५० रु. तरी मिळावेत, अशी मागणी मुंबईच्या शेअर होल्डर्स असोसिएशननें केली आहे.

**रहाणीच्या खर्चाचें मान उतरलें**—मुंबई शहर, अहमदाबाद आणि सोलापूर येथील कामगारांच्या रहाणीच्या खर्चाचें मान तुरीची डाळ, बटाटे, कांदे इत्यादि स्वस्त झाल्यामुळें उतरलें आहे. मुंबईतील खर्चाचें मान ऑक्टोबर १९४७ मध्यें २९६ होतें तें जानेवारी १९४८ मध्यें २७१ वर आलें. अहमदाबादचा निर्देशांक २३१ वरून २१२ वर आला आणि सोलापूरचा निर्देशांक २६२ वरून २४१ वर उतरला मुंबईमध्यें तूप, वांगीं, खोबरेल व मीठ हीं स्वस्त झालीं; मुगाची डाळ, मिरच्या, दूध हीं अहमदाबाद येथें स्वस्त मिळूं लागलीं आणि सोलापूरला तूप, तेल, गूळ, सरपण, सुपारी ह्यांची स्वस्ताई झाली.

**अमेरिकेला यांत्रिक नांगरांचा तुटवडा**—अमेरिकन शेतकऱ्यांची गरज भागविण्यासाठी चालू सालीं ७ लाख नवीन यांत्रिक नांगर अमेरिकेला तयार करावे लागतील, अशी माहिती प्रसिद्ध झाली आहे. १९४७ सालीं अमेरिकेंत ४,५०,००० यंत्रचलित नांगर तयार झाले. युद्धकाळांत नवीन नांगर अगर त्यांचे सुटे भाग मिळणें कठीण झालें होतें. त्यामुळें आतां ४,००,००० नांगरांची तातडीची गरज उत्पन्न झाली आहे. अमेरिकन शेतकऱ्यांची सर्व गरज भागवावयाची तर १२,००,००० नांगर तयार करणें जरूर आहे. युद्धकाळांत शेतींतील मनुष्यबळ कमी झाल्यानें शेतकरी अधिकाधिक यंत्रसामुग्री वापरूं लागले आहेत. लहान लहान शेतावर अमेरिकन शेतकरी आतां मध्यम आकाराचे यांत्रिक नांगरच वापरूं लागले आहेत.

**गव्हाच्या किंमती ठरल्या**—अमेरिका, कानडा व ऑस्ट्रेलिआ ह्या देशांमधून निर्यात होणाऱ्या गव्हाची जास्तींत जास्त किंमत दर बुशेलला दोन डॉलर्स ठरविण्यांत आली आहे. ह्या किंमतीसंबंधीच्या करारावर ३६ राष्ट्रांतर्फे सह्या झालेल्या आहेत. इंटर नॅशनल व्हीट कौन्सिलतर्फे हा निर्णय ५ वर्षांसाठी घेण्यांत आला आहे. करारांत किमान किंमतही ठरविण्यांत आली आहे. किमान किंमत १९४८-४९ सालीं दर बुशेलला १ डॉलर व ५० सेंट ठरविण्यांत आली आहे. ती दरवर्षी १० सेंटनें कमी होत जाऊन १९५२ सालीं १ डॉलर, १० सेंट इतकी होईल. एकूण ३३ देशांनीं मिळून ५० कोटी बुशेल्स् गहूं विकत घ्यावयाचा आहे. कानडा २३ कोटी बुशेल्स्, अमेरिका १८ कोटी ५० लाख बुशेल्स् आणि ऑस्ट्रेलिआ ८ कोटी ५० लाख बुशेल्स् गहू निर्यात करणार आहेत. करारांत सामील झालेल्या राष्ट्रांच्या सरकारांची मान्यता मिळाल्यावर १ ऑगस्ट, १९४८ पासून करार अंमलांत येईल. जास्तींत जास्त ठरलेली किंमत सध्याच्या बाजारभावापेक्षा ५० सेंटनीं कमी आहे. रशिआ व अर्जेंटायना ह्यांनीं करारांत भाग घेण्याचें नाकारलें आहे.

**यंत्रसामुग्रीची २७८ खोकीं**—म्हैसूरच्या कपिला टेक्स्टाइल्स कॉर्पोरेशनच्या यंत्रसामुग्रीचा पहिला हप्ता अमेरिकेहून निघाला आहे. एकून २७८ खोकीं आहेत आणि त्या प्रत्येकावर तीं फोडण्याचा अनुक्रम लिहिलेला आहे. दुसरा हप्ता एप्रिलमध्यें निघेल.

**साखरेचें उत्पादन वाढणार**—चालू वर्षी हिंदुस्थानांत सुमारें १० लक्ष, ५० हजार टन साखर तयार होईल आणि सुमारें २ लक्ष टन साखर पुढील वर्षासाठी उरेल, अशी अपेक्षा आहे. गुळाची किंमत उतरल्यामुळें उसाचा पुरवठा साखर कारखान्यांस मोठ्या प्रमाणावर होत आहे.

**ओरिएंटलचें १९४७ मधील नवें काम**—ओरिएंटल विमा कंपनीनें १९४७ सालीं २० कोटी, ३ लक्ष रुपयांचे ७६,२९७ विमे स्वीकारले.

**संयुक्त प्रांतांतील साखर कारखाने**—संयुक्त प्रांतांतील कित्येक साखर कारखान्यांचे गुदाम तयार साखरेनें भरलेले असून, सध्याच्या दरानें तिचा सत्वर उठाव होत नाहीं. बँकाहि कर्जे देण्यास उत्सुक नाहींत. ऊस गाळण्याचें काम त्यामुळें लांबणीवर पडत आहे.

**कर्जासाठी अर्ज**—हिंदुस्थान सरकारनें इं. मोनेटरी फंडाकडे ४ कोटी डॉलर्सच्या कर्जाची मागणी केली आहे, असें समजतें. हिंदुस्थानाच्या परराष्ट्रांतील खरेदीची किंमत डॉलर्समध्यें देता येण्यासाठी ही व्यवस्था आहे.

**त्रावणकोर संस्थानची धान्यखरेदी**—संस्थानांतील अन्नधान्याचा अपुरा सांठा भरून काढण्यासाठी त्रावणकोरचें सरकार लोकांना अन्नधान्य खरेदीसाठी मदत करीत आहे. ह्या मदतीसाठी रोज एक लाख रुपये खर्च होत आहेत, असें अधिकृत निवेदन आहे.

**दारूबंदीला म्हैसूरकरांची मदत**—कारवार जिल्हा हा म्हैसूर संस्थानच्या सरहद्दीला लागून आहे. कारवार जिल्ह्यांतील दारूबंदी यशस्वी करण्यासाठी त्या जिल्ह्याच्या दारूबंदीच्या अधिकाऱ्यानें नुकतीच म्हैसूर संस्थानांतील काँग्रेस कार्यकर्त्यांची गांठ घेतली. संस्थानी कार्यकर्त्यांनीं सहकार्याचें आश्वासन दिलें असून ह्या प्रकरणीं म्हैसूर सरकारलाही विनंति करण्याचें ठरविलें आहे.


लोकमान्य इंडस्ट्रीज
--लिमिटेड--
कॉमनवेल्थ बिल्डिंग, पुणें २
—चेअरमन—
श्रीमंत रावबहादूर गणेश गोपाळ शेंबेकर

सुरक्षित पैसे गुंतविण्यास नाविन्यपूर्ण
पंचवार्षिक योजना
पांच वर्षांत रकमेंत किमान २५ टक्के
वाढ मिळूं शकेल.
कंपनीचें प्रॉस्पेक्टस मागवा
वा. ना. कलंत्रे
मॅनेजिंग एजंट

# अर्थ

बुधवार, ता. २४ मार्च १९४८




संस्थापक

प्रो. वा. गो. काळे


संपादक : श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## " अखिल जगताचा प्रमुख त्राता "

### प्रे. ट्रुमन ह्यांची, अमेरिकेच्या भूमिकेची, घोषणा

प्रेसिडेंट ट्रुमन ह्यांनीं गेल्या आठवड्यांत ता. १७ रोजीं अमेरिकेनें काँग्रेसपुढें भाषण करून युरोपांतील परिस्थितीचा आढावा घेतला. युद्ध समाप्तीपासून रशियानें मध्य व पूर्व युरोपांतील देशांचें स्वातंत्र्य आणि लोकसत्तात्मक स्वरूप नष्ट करण्याचा कार्यक्रम चालूं ठेवला असून चेकोस्लोव्हाकिया हा त्याचा अगदीं ताजा बळी आहे; फिनलंड, ग्रीस, इटली, इत्यादि देशांसहि भय निर्माण झालें आहे; युरोपच्या पुनर्घटनेच्या कामीं इतर देशांशीं सहकार्य करण्यास रशियानें केवळ नकारच दिला असे नव्हे तर ह्या १६ देशांच्या मदतीस अमेरिकेनें जाणें हेंहि त्यास बिलकूल खपत नाहीं; संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या कार्यांत रशिया एकसारखें विघ्न आणीत आहे; तेव्हां युरोपांतील देशांस पाठिंबा देणें व आपला स्वतःचाहि पाया मजबूत करणें अत्यावश्यक आहे, अशी प्रे. ट्रुमन ह्यांनीं आपल्या सूचनांची पार्श्वभूमि वर्णन केली.

युरोपच्या पुनर्घटनेसाठीं काँग्रेसनें योजनांस सत्वर मान्यता द्यावी, म्हणजे युरोपांतील देशांना आर्थिक मदत पोचूं शकेल, ही प्रे. ट्रुमन ह्यांची पहिली सूचना असून दुसरी सूचना लष्करी शिक्षण सार्वत्रिक करण्याबाबतची आहे. " कम्युनिस्ट सत्तेच्या नियंत्रणाखालीं जाण्याची ज्यांस भीति निर्माण झाली आहे, अशा युरोपांतील देशांना लष्करी सहाय्य करण्यासाठीं अमेरिका सज्ज पाहिजे. युद्ध टाळण्यासहि लष्करी सामर्थ्याची आवश्यकता आहे. " अमेरिकन लष्कराचें मनुष्यबळ अधिकृत बळाइतकें मोठें राखण्यासाठीं कायद्याची योजना करणें, हा त्यांचा तिसरा मुद्दा आहे.

प्रे. ट्रुमन ह्यांनीं ता. १७ रोजीं संध्याकाळींहि एक भाषण केलें, त्यांत त्यांनीं आपल्या सकाळच्या भाषणाचें विशदीकरण केलें. संयुक्त राष्ट्रसंघटना निर्माण करण्यांत आपण पुढाकार घेतला, परंतु त्या संघटनेचे कार्यांत खीळ घालण्याचा एका देशाचा प्रयत्न अव्याहत चालू आहे; आणि मार्शल योजनाहि तो हाणून पाडीत आहे, असें ते म्हणाले. लाटाव्हिया, लिथ्वेनिया, एस्टोनिया, पोलंड, रुमेनिया, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, अल्बानिया हंगेरी, चेकोस्लोव्हाकिया इत्यादि देशांवर रशियानें आपली पकड बसविली आहे. ह्यास कांहीं शेवट आहे कीं नाहीं ? युरोपांतील १६ देशांची सहकार्याची योजना व ब्रुसेल्स येथील युरोपियन पांच प्रमुख राष्ट्रांचा करार, ह्या गोष्टी आशादायक आहेत. सबंद जगाचा प्रमुख त्राता, अशीच अमेरिकेची आजची भूमिका झाली आहे. त्यासाठीं अमेरिकेंतील दोन्ही पक्षांमध्यें पूर्ण एकोपा दीर्घकाल नांदला पाहिजे. प्रे. ट्रुमन ह्यांनीं, जगापुढील आजच्या प्रश्नाचें स्वरूप एका वाक्यांत व्यक्त केलें. " दडपशाही विरुद्ध स्वातंत्र्य " हा आजचा लढा आहे, असें सांगून कम्युनिझमचा नाश करण्यासाठीं धार्मिक कारणांचाहि त्यांनीं उल्लेख केला.

रशियास यशस्वी रीतीनें तोंड देतां यावें, ह्यासाठीं युरोपांतील लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारणें आणि त्यांस लष्करी सहाय्य करणें, हा प्रे. ट्रुमन ह्यांच्या भाषणाचा आशय आहे. आर्थिक हलाखी कम्युनिझमच्या वाढीस पोषक असते, तेव्हां ही हलाखी दूर करून लोकशाहीचा विजय जाहीर करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न राहील, हें उघड आहे. ह्यासाठीं मार्शल योजनेची उपकारक मदत लवकर पोचविण्याची त्यांची घाई आहे. युरोपांतील देश ह्या मदतीनें किती लवकर व केवढ्या मोठ्या प्रमाणावर पुष्ट होतील, ह्यावर बरेंच अवलंबून आहे. प्रे. ट्रुमन ह्यांनीं अमेरिकन जनतेस अमेरिकन राष्ट्रानें पत्करलेल्या जबाबदाऱ्यांची जाणिव करून दिली आहे, युरोपांतील राष्ट्रांस प्रभावी सहायाचें आश्वासन दिलें आहे आणि रशियास आव्हान दिलें आहे. रशियाची लष्करी तयारी इतरांना वाटते तितकी जबर नाहीं, हा विश्वास वस्तुस्थितीस धरून असेल, तर प्रे. ट्रुमन ह्यांचें धोरणास सत्वर यश येण्यास अनुकूल परिस्थिति आहे हें उघड आहे.

रशिया विरुद्ध अमेरिका, हीं जगाच्या आखाड्यांतील प्रमुख राष्ट्रें आहेत आणि युरोप हें त्यांच्या तेढीचें मुख्य क्षेत्र आहे. परंतु हीं दोन्ही राष्ट्रें इतकी बलवान आहेत, कीं त्यांच्या संघर्षाच्या झळा कांहीं क्षेत्रापुरत्याच मर्यादित रहाणें अशक्य आहे, आणि कोणत्या ठिणगीनें कोठें आग भडकेल हें सांगता येणें कठीण आहे. ह्या संबंधांत चीनचा उल्लेख केला जात आहे. दक्षिण अमेरिका खंडांतील देशांमध्यें एकमेकांत यादवी निर्माण होऊं पहात आहे. अमेरिकेनें युद्धाची तयारी चालविली म्हणजे हिंदुस्थानाची यंत्रसामुग्रीची मागणी पुरी पडणें कठीण जाईल अशी भीति हिंदी अर्थमंत्र्यांनीं व्यक्त केली आहे. ही भीति खरी ठरली, तर आपल्या औद्योगिक उत्पादन वाढीस फारच मोठी गैरसोय निर्माण होणार आहे. त्यांतून आणखी काय नव्या अडचणी व नवे प्रश्न निर्माण होतील, ह्याची कल्पना करणें अवघड नाहीं.

---

### सहकारी जगत्

सहकारविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट आणि महाराष्ट्र विभाग सहकारी शिक्षणमंडळ ह्यांचें हें मुखपत्र निघूं लागलें आहे. त्रैमासिकाचा पहिला अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्रैमासिकाचे चार अंक जानेवारी, एप्रिल, जुलै व ऑक्टोबर महिन्यांत प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. त्रैमासिकांत चार भाषणें उद्धृत केलेलीं असून तीन लेख देण्यांत आले आहेत. संपादकीय स्फुटांत त्रैमासिकाची पार्श्वभूमि सांगितलेली असून पुणें येथें यशस्वी रीतीनें पार पडलेल्या महाराष्ट्र विभाग सहकारी परिषदेची हकीकत दिली आहे. सहकारी कायद्यांतील दुरुस्त्यांचीहि चर्चा केली आहे. कॅप्टन मोहिते ह्यांच्या अहवालाचाहि परामर्श घेतला आहे. त्रैमासिकाची वार्षिक वर्गणी ट. ख. सह १ रु. ११ आ. आहे.

## हिंदी नौकानयनाचें पुनरुज्जीवन

हिंदी कामगार व हिंदी भांडवल ह्यांच्या मदतीनें तयार झालेली पहिली संपूर्ण हिंदी नौका नुकतीच समुद्रप्रवास करूं लागली. हिंदी संघराज्याचे पंतप्रधान पं. नेहरू ह्यांनीं 'जलउषा' नांवाच्या ह्या नौकेचा नुकताच जलतरण समारंभ साजरा केला. शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीनें परदेशी जहाजांच्या कंपनीशीं जी यशस्वी स्पर्धा केली ती प्रसिद्धच आहे. किंबहुना हिंदी स्वातंत्र्याचा झगडा आणि नौकानयनाचा इतिहास एकमेकांशीं समांतरच चालले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, १९१९ सालीं दडपशाहीच्या रौलट कायद्याविरुद्ध लढा सुरू झाला त्याच सालीं शिंदिया कंपनीची पहिली बोट वहातुक करू लागली. तथापि, हिंदुस्थानांत पूर्वी बरीच पुढारलेली नौका बांधण्याची कला व शास्त्र पुन्हा पुढें सरसावण्यास १९४१ साल उजाडलें. ह्या सालीं विझगापट्टम् येथें जहाजें बांधण्याच्या प्राथमिक तयारीला प्रारंभ करण्यांत आला. गोदीच्या जागेला गांधीग्राम नांव ठेवण्यांत आलें आणि इमारतीचा कोनशीला समारंभ बाबू राजेंद्र प्रसाद ह्यांच्या हस्तें करण्यांत आला.

विझगापट्टम् येथें बोटी बांधण्यास अनुकूल अशा सोयी निसर्गतःच उपलब्ध आहेत. आंध्र देशांतील तें एक महत्त्वाचें बंदर असून ५५ एकर मोकळी जमीन किनाऱ्या नजीकच तेथें मिळूं शकली. शिवाय ह्या ५५ मैलाच्या किनाऱ्यावर ३० फूट खोल पाणी सर्वत्रच आहे. ह्यामुळें भरतीचा फायदा घेऊन मोठीं जहाजें वर्षाच्या कोणात्याही ऋतूंत समुद्रतरण करूं शकण्याची सोय आहे. असें असलें तरी युद्ध परिस्थितीमुळें जहाजें बांधण्याच्या कामाला रंगरूप येण्यास १९४७ साल उजाडलें. आता बांधण्याच्या गोदींत ४ कोटी रुपये भांडवल गुंतलेलें आहे. दरवर्षी ८ ते १० हजार टन वजनाच्या दोन बोटी ह्या गोदींत बांधता येतील. जास्तींत जास्त ५५० फूट लांबीच्या आणि १२,००० टनांच्या माल वाहू शकणाऱ्या बोटी बांधण्याची व्यवस्था होऊं शकेल. सध्या गोदींत कुशल व अर्धकुशल असे ३ हजार कामगार काम करीत आहेत. तज्ज्ञांच्या मतें, हिंदी कामगारांना बोटी बांधण्याचें शास्त्र चांगलें अवगत होण्यास ३ ते ५ वर्षे लागतील. लॉइडस सर्व्हेअरच्या देखरेखीखालीं सध्या जहाजें बांधलीं जात आहेत. जहाजें बांधण्याचें काम विशेष कसबाचें असल्यामुळें शिंदिया कंपनीनें ७ ब्रिटिश तज्ज्ञांना नौकरीला ठेवलें आहे. ह्या शिवाय युद्ध काळांत तयार झालेले बेव्हिन बॉइज आणि इंजिनिरिंगचे पदवीधर ह्यांचाही भरणा केलेला आहे. तयार झालेली पहिली बोट 'जलउषा' ही एकूण ८ हजार टनांची असून नौकेवरील आधिकारी व खलाशी ह्यांच्या शिवाय १२ प्रवाशांची सोय तीवर करण्यांत आलेली आहे.

हिंदी नौकानयनाच्या धंद्याला सरकारी उत्तेजन देण्याचें आश्वासन आतां मिळालेंच आहे. तथापि, ह्या बाबतींत केलेली प्रगति आणि करावयाची प्रगति ह्यांच्यांत बरीच तफावत आहे हें विसरून चालणार नाहीं. सध्या हिंदुस्थानजवळ अवघ्या ३ लाख टन वजनाच्या बोटी आहेत. युद्ध सरकारनें ठरविलेलें ध्येय २० लाख टनांचें आहे. इतक्या वजनाच्या बोटी तयार होतील तेव्हांच हिंदुस्थानच्या किनाऱ्याची सर्व वहातूक आणि बरीचशी आयात-निर्यातीची वहातूक स्वदेशीं जहाजांतून करतां येईल.

**शहरांचें नवें नामकरण**—मद्रास प्रांतांतील शहरांची व गांवांचीं नांवें हिंदी धर्तीचीं ठेवण्याचें धोरण मद्रास प्रांताच्या सरकारनें ठरविलें आहे. ह्या धोरणास अनुसरून बेझवाड्याचें नांव विजयवाडा ठेवण्याची सूचना सरकारनें मान्य केली आहे.

## सावकारी नियंत्रण कायदा

### ठेवीदार किंवा पैसे गुंतविणारे यांचे बाबतींत खुलासा

व्यापाऱ्यांना जे कर्ज देतात अथवा त्यांचेकडे जे ठेवी ठेवतात, अशा इसमांना १९४६ चा मुंबई सावकार नियंत्रण कायदा लागू आहे किंवा कसे आणि लागू असल्यास त्यांनीं असे व्यवहार करण्याकरितां लायसेन्स मिळविणें जरूर आहे काय, अशी सरकारकडे विचारणा करण्यांत येत आहे.

कायद्याच्या २ [ ९ ] [ जी ] या कलमानुसार व्यापाऱ्यांना देण्यांत आलेल्या कर्जाचे बाबतींत कायद्याचीं २३ व २५ हीं कलमें लागू आहेत. दुसरें कोणतेंहि कलम अशा कर्जांना लागू नाहीं. तेव्हां कायद्याच्या २ [ १८ ] कलमांत स्पष्ट केल्याप्रमाणें केवळ व्यापाऱ्यांना कर्जें देणाऱ्या इसमांना लायसेन्स काढण्याची गरज नाहीं. तथापि अशा व्यापाऱ्यांखेरीज ते इतरांना कर्जें देत असतील तर त्यांनीं लायसेन्स काढलें पाहिजे आणि अशा कर्जांच्या बाबतींत त्यांना कायदा लागू होतो.

ठेवीच्या अथवा पैसे गुंतविण्याच्या खऱ्याखुऱ्या व्यवहारांना १९४६ चा मुंबई सावकार नियंत्रण कायदा लागू नाहीं, मात्र वस्तुतः जे सावकारीचेच व्यवहार असून ते ठेवीचे अथवा पैसे गुंतविण्यासंबंधीचे आहेत असा नुसताच देखावा करण्यांत आला असेल तर ते कायद्याच्या कक्षेंत येतील. म्हणून भोंवतालची एकूण परिस्थिति लक्षांत घेतां असे व्यवहार ठेवीचे अथवा पैसे गुंतविण्याचे आहेत हें ओळखण्याची सोय केली पाहिजे. तसेंच प्रत्येक व्यवहार अशाच स्वरुपाचा आहे हें सिद्ध करण्यास पुरावा असला पाहिजे.

ऋणको कर्जासाठीं सावकाराकडे जातो, तर ठेव ठेवणारा अथवा पैसे गुंतविणारा इसम आपला पैसा सुरक्षित रहावा अथवा तो गुंतवून ठेऊन त्यापासून आपल्याला कमी कां होईना, परंतु सुरक्षितपणें व्याज अथवा उत्पन्न मिळावें अशा दृष्टीनें पैसे दुसऱ्याकडे अडकवितो. तेव्हां अशा ठेवींच्या अथवा पैसे गुंतविण्याच्या व्यवहारांत सावकारीची दृष्टि नसल्यामुळें त्याचे बाबतींत सदरहू कायदा लागू नाहीं.

### इंपीरिअल बँकेचा ताळेबंद

तुलनात्मक आकडे ( लक्ष रुपयांचे )

| | १९३९ | १९४६ | १९४७ |
|---|---|---|---|
| भांडवल | ५,६२ | ५,६२ | ५,६२ |
| रिझर्व्ह फंड | ५,६० | ६,१७ | ६,२५ |
| ठेवी | ८७,८४ | २७१,६७ | २८६,५८ |
| गुंतवणूक | | | |
| सरकारी रोखे | ३७,०६ | १४४,०२ | १५८,३८ |
| इतर रोखे | ९७ | १०,५० | ५,८० |
| कर्जे | ४८,२७ | ९४,२७ | ८९,१५ |
| रोख | ११,०९ | ४२,४५ | ४२,८९ |
| इमारती | १,८५ | १,५७ | १,५३ |
| ताळेबंदाची बेरीज | ९९,७८ | २९४,३८ | २९९,३९ |
| ठेवीशी प्रमाण | % | % | % |
| रोख | १२·५० | १५·५ | १४·९ |
| गुंतवणूक | ४२·०३ | ५६·८ | ५७·३ |
| कर्जे | ५४·५४ | ३४·७ | ३१·२ |

## रशियानें रेशनिंग कसें रद्द केलें ?

( लेः—श्री. विश्वनाथ त्र्यंबक शेटे, बी. ए., एलएल. बी.

( मागील अंकावरून समाप्त )

या सर्व धडामोडींमागें रशियन नेत्यांनीं एकच दृष्टि ठेवली होती, ती ही कीं जनतेंतील जे शेंकडा ८० टक्के लोक आपल्या श्रमावर दैनंदिन पैसे मिळवून आपले जीवन जगतात, त्यांना जीवनोपयोगी वस्तू सहजसुलभतेनें मिळावयाच्या असल्यास त्यांच्यावर सांठवून संपत्ति ठेवलेल्या लोकांची उडी पडावयास नको. यासाठी ज्यांनीं अधिक संपत्ति सांठविली असेल व ज्याच्या जोरावर ते ठराविक प्रमाणांत उपलब्ध असलेल्या वस्तू वाटेल तो भाव देऊन खरेदी करीत असत, व त्यामुळें बहुसंख्य श्रमजीवी लोकांच्या खरेदीच्या किंमतीच्या आटोक्याच्या बाहेर नेत असत, त्यांच्या त्या नफेबाजीला आळा पडावा यासाठीं त्यांच्या जवळचें जादा चलनच काढून घेतल्यानें अस्तित्वांत असलेलें धान्य व तयार माल सम प्रमाणांत वाटण्याची शक्यता उत्पन्न झाली. त्यामुळेंच रेशनिंग उठविण्यांत व त्यानंतरही वस्तू स्वस्त भावांत व सम प्रमाणांत मिळण्याची सोय झाली. यामुळें बहुसंख्य रशियन जनता आनंदित झाली यांत शंका नाहीं. परंतु या बहुसंख्य जनतेला आनंद प्राप्त व्हावा म्हणून मूठभर श्रीमंतांचा जादा. सांठवलेला पैसा हिसकावून घेण्याची खंबीरता रशियन राष्ट्रनेत्यांनीं दाखविली हाच त्यांचा विशेष आहे. यामुळें रशियन कामगाराच्या वेतनांत एकप्रकारें वाढच झाली आहे यांत शंका नाहीं; कारण पूर्वीच्या किंमतीपेक्षा त्यांना त्याच वेतनांत अधिक वस्तू खरेदी करावयास मिळत आहेत. अन्नधान्याच्या किंमती रेशनमध्यें असलेल्या किंमतीपेक्षा शेंकडा १० ते १२ प्रमाणांत व व्यापारी किंमतीच्या दृष्टीनें त्या शेंकडा ६० प्रमाणांत कमी झाल्या आहेत. युद्धापूर्वी जे अन्नधान्याचे भाव होते तेच सबंध युद्ध कालांत रेशनमध्यें अन्नधान्याचे भाव होते हे याबाबतींत लक्षांत ठेवले पाहिजे. यावरून नवीन चलन धोरणामुळें किती मोठ्या प्रमाणावर रशियन जनतेचा फायदा झाला असेल हें आपल्या लक्षांत येईल. मग असे सुखावह जीवन व्यतीत करावयास मिळाल्यावर कामगारवर्ग हौसेनें मोठ्या प्रमाणावर मालाची निपज करून राष्ट्राच्या संपत्तींत वाढ कीं करणार नाहीं ?

आपल्याहि देशांत कसें का होईना, बहुतेक रेशनिंग रद्द झालें; परंतु त्याच्या यशाला आवश्यक असलेली आर्थिक परिस्थिती धुरीणांनीं उत्पन्न केली नाहीं तर जनतेस सुख कसें लागेल ? चलनाची बेसुमार वाढ, कांहीं थोड्या लोकांजवळ सांठत गेलेली अमर्याद संपत्ती, कामगारांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणें मिळणारें फळ व त्यामुळें वाढत चाललेला असंतोष आणि मालाच्या उत्पादनांत त्यामुळें होणारी घट हे भस्मासुर दूर करण्याचे जोंपर्यंत आपल्या नेत्यांचे प्रयत्न यशस्वी होत नाहींत तोंपर्यंत केवळ रेशनिंग उठवून एकदम आनंदी आनंद होण्याचा संभव नाहीं हें सुतराम सत्य आहे. या बाबींत योजनाबद्ध अशी एखादी तत्वप्रणाली आंखून अमर्याद संपत्ति सांठवलेल्या कांहीं अल्पसंख्य व्यक्तींना राष्ट्रावर परिणाम होणाऱ्या आर्थिक उलाढालींत ढवळाढवळ करण्याची संधि सांपडणार नाहीं अशी वेळींच खबरदारी घ्यावयास पाहिजे. धनवानांच्या संपत्तीचा उपयोग औद्योगिक वाढींत होण्याची जेवढी कोशीस सध्यां करण्यांत येते त्याच तीव्रतेनें शेंकडा ८० लोकांच्या सामाजिक जीवनराहणीचा दर्जा वाढतो कीं नाहीं याकडहा तावडतोब लक्ष द्यावयास पाहिजे.

शंका—समाधान

## सेव्हिंग चेक्सवर खातेक्रमांक

### गौप्यस्फोटाची भीति

"आपल्या धनको गिऱ्हाइकांच्या ठेवींबाबत, सर्व प्रकारची गुप्तता राखणें हें बँकांचें एक महत्त्वाचें कायदेशीर कर्तव्य आहे. परंतु, सेव्हिंग्ज ठेवीदारांना चेकबुकें पुरविणाऱ्या बँकांपैकी बऱ्याचशा बँका सदर चेकांवर चेक काढणाऱ्याच्या खात्याचा क्रमांक घालण्याचा आग्रह धरीत आहेत व गिऱ्हाइकांचें खातेक्रमांक जाहीर करून गौप्य स्फोटाची जबाबदारी स्वतःवर ओढवून घेत आहेत ... खातें क्रमांक जगजाहीर होणें धोक्याची गोष्ट आहे......... ती पद्धत बंद पाडली जाणें जरूर आहे" वगैरे मजकूर 'व्यापारी महाराष्ट्र'मध्यें प्रसिद्ध झाला आहे. चेकांवर खातेक्रमांक घातल्यानें गिऱ्हाइकांच्या एका महत्त्वाच्या कायदेशीर हक्काची पायमल्ली होत आहे, असें त्यांत म्हटलें आहे. सेव्हिंग्ज खात्यावर खातेक्रमांक घातल्यानें गिऱ्हाइकांचें काय नुकसान होतें, बँकेची त्यांत सोय होत असल्यास खातेक्रमांक घालण्यास काय हरकत आहे, वगैरे शंका कांहीं वाचकांनीं विचारल्या आहेत.

### खुलासा

चेकवरील खातेक्रमांक जगजाहीर होण्यांत साधारणतः कांहींच धोका नाहीं. एखाद्याचें एखाद्या बँकेंत खातें आहे, हें चेकवरून कळतेंच; खातेनंबर कळला तरी त्रयस्थास त्याचा कांहींही फायदा नाहीं; परंतु, एखाद्या खातेदाराच्या खात्यावर जप्ती आणावयाची असली तर त्याचें बँकेंत खातें आहे एवढी माहिती कोर्टास पुरेशी होत नाहीं; निश्चित खातेक्रमांक आवश्यक असतो. हा खातेक्रमांक मिळाला नाहीं तर जप्ती आणणें फार अवघड होऊन बसतें आणि बँका सहाजीकपणेंच गौप्यस्फोट करीत नाहींत. खातेदाराचा खातेक्रमांक त्याच्या चेकवर लिहिला गेला म्हणजे त्याच्या खात्याचा क्रमांक सहाजीकच जाहीर होतो आणि त्यामुळें खात्यावर जप्ती आणूं इच्छिणारांचें काम सुकर होऊं शकतें. अशा रीतीनें, खातेदाराचें नुकसान होतें असा वरील मजकुराच्या लेखकाचा मथितार्थ आहे.

बँकेनें सेव्हिंग्ज खात्यावर खातेक्रमांक घालण्याची पद्धत पाडली आणि खातेदारानें तो क्रमांक पुसून टाकला तर बँक खातेदाराचे पैसे परत देऊन त्याचें खातें बंद करूं शकेल. खातेदारास चेकबुक देतांनाच बँक चेकांवर खातेक्रमांक घालून देते आणि हें चेकबुक स्वीकारणें म्हणजेच चेकांवरील खातेक्रमांकाच्या आकड्यास मान्यता दिल्यासारखें होतें. अशा रीतीनें खातेक्रमांकाचा चेकवरील आकडा पत्करल्यानंतर खातेदारास तक्रारीस जागाच उरत नाहीं. "माझ्या चेकवर खातेक्रमांक घालता कामा नये" ह्या अटीवरच खातें उघडण्याचा एखाद्यानें प्रयत्न करून पहाण्यासारखा आहे. बँक स्वतःची सर्वसाधारण पद्धत मोडून अपवाद करील हें संभवनीय नाहीं. म्हणजे, ज्यास गौप्यस्फोटाची भीति वाटत असेल त्यास मार्ग मोकळा आहे. त्यानें सेव्हिंग्ज बँक खात्यावरील चेक सोडूं नयेत; जरूर तेव्हां स्वतःच बँकेंत जाऊन व्यवहार करावा, म्हणजे खातेक्रमांक लिहिलेले चेक दुसऱ्याच्या हातीं पडण्याचा प्रश्नच उद्भवणार नाहीं.

**सरकारी उत्पन्न बुडवलें ?**—सरकारी टेलिफोन किंवा तार ह्यांचा उपयोग न करतां, स्वतःच्या ट्रॅन्समिटर्सच्या मार्फत बाजारभाव पुरवून सरकारचें लक्षावधि रुपयांचें उत्पन्न बुडविण्याच्या आरोपावरून मुंबईच्या दोघांस पकडण्यांत आलें आहे.

## पुस्तक परीक्षण

### मुंबई शेतकरी कर्जनिवारण कायदा

तयार करणार—लॉ अॅकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २

सदरचें पुस्तक आमचेकडे अभिप्रायार्थ आलेलें आहे. पुस्तकांत सुबोध मराठी कलमवार व सटीप भाषांतरासह मूळ इंग्रजींतील 'बॉम्बे अॅग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ अॅक्ट 'चा सर्व तर्जुमा देण्यांत आलेला आहे त्याचप्रमाणें ह्या कायद्याखालील नियम व अर्जांचे नमुने ह्यांचाहि समावेश पुस्तकांत केलेला असल्यामुळें त्याची उपयुक्तता वाढलेली आहे. कायद्यावरील मराठी टीपांमध्यें मूळ कायद्यांत अनुषंगानें आलेले अन्य ठिकाणचे संदर्भ सुस्पष्ट व निश्चित खुलासा करून दिलेले आहेत. उदाहरणार्थ, कित्येक ठिकाणीं 'जमीन महसुलाचा कायदा' (लॅन्ड रेव्हेन्यू कोड) अथवा 'दिवाणी कामें चालविण्याच्या पद्धतीचा कायदा' (सिव्हिल प्रोसिजर कोड) ह्यांतील ज्या ज्या भागांचा संदर्भ मूळ कायद्यांत देण्यांत आलेला आहे ते ते भाग टिपांमध्यें सविस्तर उद्धृत केलेले आहेत, त्यामुळें हें पुस्तक जास्त सुबोध झालेलें आहे. मात्र पुस्तकाच्या आरंभींच विषयवारीमध्यें 'शेतकरी कर्जनिवारणा'ची पूर्वपीठिका देतांना वापरलेली शब्दरचना अत्यंत सदोष आहे. कायद्याचीं पुस्तकें हीं तत्संबंधी परस्पर-विरुद्ध अशा दोन्ही पक्षांचे लोक वाचीत असतात. अशा पुस्तकांत कोणत्याहि घटनांचा उल्लेख करीत असतांना लेखकानें आपली तटस्थता ढळूं देणें इष्ट नाहीं. अशा दृष्टीनें पाहतां पूर्वपीठिकेमध्यें 'सावकारी जळवा लागून रक्तशोषण झालेला शेतकरी' अशा तऱ्हेचे शब्दप्रयोग अनिष्ट वाटतात. ते टाळलेले बरे! पुस्तकाच्या मराठी भागाचे शेवटीं विषयसूचीहि जोडण्यांत आलेली आहे. एकंदरींत पुस्तकाची रचना समाधानकारक वाटते.

### घरगुती उपयुक्त औषधें

(संग्राहक : श्री. ब. सो. ताकवाले, संपादक, 'किसान', अकोला. भाग पहिला, पृ. सं. ३४, किं. ६ आ.; भाग दुसरा, पृ. सं. ३२, किं. ६ आ.) 'किसान 'चे संपादक श्री. ताकवाले ह्यांनीं १९४२ सालीं 'किसान प्रकाशन' सुरू केलें त्याचीं हीं पहिलीं दोन पुष्पें आहेत. विनामूल्य मिळणाऱ्या वनस्पतींची खेड्यांतील लोकांना असलेली औषधीमाहिती 'किसान'मध्यें देण्यांत येते, तिचा फायदा सर्व जनतेस व्हावा ह्या दृष्टीनें पहिलें पुष्प १९४२ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आलें. वनौषधींवरील जनतेचा विश्वास उडत गेल्यानें गरीब जनतेची शारीरिक व सांपत्तिक लूट होत आहे, त्याला अंशतः तरी आळा घालण्याचा त्यांत उद्देश होता. पहिल्या पुष्पांत निरनिराळ्या ११२ रोगांवरील उपचार दिलेले आहेत. १९४२ च्या आंदोलनांतील दीर्घ कारावासाच्या व युद्धजन्य अडचणींच्यामुळें दुसरा भाग प्रसिद्ध करण्यास उशीर लागला. ह्या दुसऱ्या भागांत १३० रोगांवरील उपचार दिले असून पहिल्या भागांत दिलेल्या रोगांवरील इतरहि आणखी उपचार आहेत. पहिल्या भागाची दुसरी आवृत्ती काढावी लागली, ह्यावरून "घरगुती उपयुक्त औषधें" ह्या उपक्रमाची आवश्यकता सिद्ध होते.

### मोटार वहातुकीच्या राष्ट्रीयीकरणास प्रारंभ

मोटार वहातुकीच्या राष्ट्रीयीकरणाचा मुंबई सरकारचा कार्यक्रम खालीलप्रमाणें आहे. पुणें, सातारा व सोलापूर जिल्ह्यांतील वहातुक नोव्हेंबर १९४८ पूर्वी सरकारी मालकीची होईल. फेब्रुवारी १९४९ पूर्वी अहमदाबाद व खेडा ह्या जिल्ह्यांतील वहातुकीचें राष्ट्रीयीकरण होईल. मार्च १९४९ अखेर विजापूरची पाळी येईल.

### गिरण्यांच्या ब्रिटिश यंत्रसामुग्रीची निर्गत

ग्रेट ब्रिटननें १९४७ सालीं ८१,००७ टन इतकी गिरण्यांची नवी यंत्रसामुग्री निर्गत केली. तिची किंमत २ कोटी, ४६ लक्ष पौंड भरली. निर्गतीचे तुलनात्मक आकडे खाली दिले आहेत:—

| वर्ष | टन | किंमत (लक्ष पौंड) | दर टनी सरासरी किंमत (पौंड) |
|---|---|---|---|
| १९२१ | १,५७,०४४ | २५१ | १६० |
| १९३८ | ७०,७७५ | ८४ | ११९ |
| १९४४ | १४,२८७ | ५१ | ३५५ |
| १९४५ | १६,८२३ | ५७ | ३३८ |
| १९४६ | ५२,९०० | १४७ | २७८ |
| १९४७ | ८१,००७ | २४६ | ३०३ |

### ही यंत्रसामुग्री गेली कोठें?

| देश | टन |
|---|---|
| हिंदुस्थान | २३,४६४ |
| इजिप्त | ९,४२८ |
| ब्राझील | ५,१९४ |
| चीन | ४,४४१ |
| अर्जेंटिना | ४,२७४ |

## निराशाजनक औद्योगिक प्रगतीवर तोडगा

"आपल्या कारखान्यांनीं १९४४ व १९४५ मध्यें उत्पादनाचा उच्चांक गांठला, परंतु युद्ध समाप्तीनंतर तें एकसारखें घटत चाललें आहे. त्यामुळें पुष्कळ यंत्रसामुग्री उत्पादनक्षम असूनहि आज ती पडून आहे आणि लोक बेकार होत आहेत. ह्या बरोबरच रहाणीचा खर्च वाढत चालला आहे. खर्चास उपलब्ध असलेलें चलन आणि मालाचा उतरता पुरवठा ह्यांचेमधील तफावत वाढत्या प्रमाणावर आहे. चलनवाढीस आतां आळा बसला, तरी उपलब्ध मालाचा तुटवडा वाढत असल्यानें किंमती चढत्या रहाणें अपरिहार्य आहे. आपल्या देशाची नैसर्गिक संपत्ति वास्तविक पहातां हिंदुस्थानास औद्योगिक दृष्ट्या समृद्ध करण्यास पुरेशी आहे. आपण आतांपर्यंत परिस्थितीचें निदानच फक्त करूं शकलों आहों. परदेशांतून कांहीं यंत्रसामुग्री व कच्चा माल आयात करणें आपणांस आवश्यक आहे. त्यासाठी सध्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर विनिमयसाधन पाहिजे. सध्याच्या संक्रमणकाळांत देशांत सर्वत्र औद्योगिक सुनियंत्रितपणा पाहिजे; सर्वांनीं उत्पादन वाढविण्यासाठीं मनापासून झटलें पाहिजे." :—हिंदुस्थान सरकारचे उद्योगमंत्री, डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी ह्यांचें रेडिओवरील भाषण.

### पाकिस्तानची वार्षिक गरज व त्याचें उत्पादन

| | वार्षिक गरज | वार्षिक उत्पादन |
|---|---|---|
| मिलचें सूत | १०,४०,००० गांठी | ९,००० गांठी |
| मिलचें कापड | ७५,००,००० गांठी | ५१,१२० गांठी |
| कोळसा | ३५,००,००० टन | २,८८,००० टन |
| लोखंड-पोलाद | ३,१६,००० टन | २५,००० टन |
| सिमेंट | ३,१०,००० टन | ५,८५,००० टन |
| साखर | ९,४५,००० टन | २५,००० टन |

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ला १९४७ सालीं १ कोटी, ७० लक्ष रु. नफा झाला. १९४६ सालीं १ कोटी, ६२ लक्ष रु. नफा झाला होता. पंजाबमधील कर्जाच्या वसुलीची खात्री नसल्यामुळें, बँकेनें ३५ लक्ष रु. कॉन्टिजन्सी फंडांत टाकले आहेत. कराच्या तरतुदीसाठीं ६० लक्ष रु. लागले. वर्षाचें डिव्हिडंड १४% करमाफ पडलें.

### "व्यापार–उद्योग" चा महात्मा गांधी विशेषांक

महात्माजींच्या तत्त्वज्ञान आणि विविध विषयांवरील त्यांची विचारसरणी संग्रहित करून वाचकांपुढें ठेऊन त्यांच्या कार्याचा शक्य तो प्रचार करावा, ह्या हेतूनें वरील १०० पानी विशेषांक प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यांत गांधीजींच्या तत्त्वज्ञानाची आणि त्यांच्या सर्वांगिण कार्याची माहिती देणारे अनेक लेख एकत्रित करण्यांत आले आहेत. त्यांच्या नीतिमूलक अर्थशास्त्राबद्दल बरेच मतभेद असले तरी व्यक्तीच्या अर्थाकडे न पहातां अखिल राष्ट्राची संपत्ति व्यापक अर्थानें वाढविणारें जें शास्त्र तें अर्थशास्त्र अशी त्यांची विचारसरणीच सर्व प्रगतिमान सिद्धांतांच्या मुळाशी आहे. विशेषांकाची किंमत १ रु. आहे.

---

**बिहारमधील निर्वासितांची सोय**—१९४६ सालीं बिहारमधील पाटणा जिल्ह्यांत झालेल्या जातीय दंगलींत मालमत्तेचें खूप नुकसान झालें. ह्या दंगलींत उध्वस्त झालेल्या घरांपैकीं ८० टक्के घरें पुन्हां बांधण्यांत आलीं आहेत. १५० खेड्यांतून अजून पुनर्घटनेचें काम चालूं आहे. आतांपर्यंत १० हजार निर्वासितांची सोय लावण्यांत आली आहे.

**ब्रिटिश रेडिओचा निर्गत व्यापार**—ग्रेट ब्रिटननें १९४७च्या डिसेंबरमध्यें एकूण १ कोटी, ३५ लक्ष रुपयांचे रेडिओ निर्गत केले. त्यांपैकी २७ लक्ष रुपयांचे रेडिओ हिंदुस्थानानें घेतले. नॉर्वे आणि आयरा ह्यांच्या खरेदीचा अनुक्रम नंतर लागतो. सबंध १९४७ चे आकडे पाहिले, तर त्या वर्षी ब्रिटिश रेडिओच्या एकूण निर्गतीची किंमत १४ कोटी रु. झाल्याचें आढळतें. १९३८ मध्यें ब्रिटननें फक्त २½ कोटी रुपयांचेच रेडिओ निर्गत केले होते. १९४७ मधील निर्गतिमधील निम्मा हिस्सा ब्रॉडकास्ट रिसीव्हिर व रेडिओ–ग्रामोफोन ह्यांचा आहे. निर्गत झालेल्या व्हॉल्व्हची किंमत १ कोटी रुपये भरली.

**रवींद्रनाथांच्या हस्तलिखितांचें चित्रीकरण**—रवींद्रनाथ टागोर ह्यांच्या ग्रंथांच्या हस्तलिखितांच्या मायक्रोफिल्म्स हिंदुस्थान सरकारनें घेऊन ठेवल्या आहेत असें समजतें. ह्या फिल्म्समध्यें 'गीतांजली' च्या हस्तलिखिताचीही फिल्म आहे. गीतांजलीबद्दल रवींद्रनाथांना नोबेल पारितोषक मिळाल्याचें प्रसिद्धच आहे.

**इटलींतील प्रदर्शनांत हिंदी माल**—पश्चिम युरोपांत हिंदी मालाची निर्यात वाढविण्याच्या दृष्टीनें इटलींतील मिलन शहरीं पुढील महिन्यांत भरणाऱ्या प्रदर्शनांत हिंदुस्थान भाग घेणार आहे. प्रदर्शनांत १० लाख रुपये किंमतीच्या निरनिराळ्या १०० वर वस्तू ठेवण्यांत येणार आहेत.

**विजेच्या कारखान्यांचें राष्ट्रीयीकरण**—मद्रास प्रांताच्या सरकारनें प्रांतांतील विजेच्या उत्पादनाचे कारखाने राष्ट्रीय मालकीचे करण्याचें ठरविलें आहे. राष्ट्रीयीकरण करण्याची अधिक सोपी पद्धत निर्दिष्ट करणारें बिल लवकरच मद्रास विधिमंडळांत मांडलें जाईल. खुद्द मद्रास शहराचा वीजपुरवठा कारखाना पूर्वीच राष्ट्रीय मालकीचा झाला आहे.


### ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, ओगलेवाडी.

## नो टी स

वरील कंपनीच्या भागीदारांची सत्ताविसावी वार्षिक साधारण सभा ओगलेवाडी येथील कंपनीच्या बिझिनेस ऑफिसमध्यें रविवार ता. २५ माहे एप्रिल सन १९४८ रोजीं दोनप्रहरीं ३ वाजतां खालील कामांचा विचार करणेंसाठीं भरणार आहे. तरी सदर सभेस आपण यावें अशी विनंती आहे.

(१) डायरेक्टर्स यांनीं केलेला रिपोर्ट व ता. ३१-१२-१९४७ अखेरचा हिशोब तपासनिसांनीं तपासलेली ताळेबंद व नफातोटापत्रकें स्वीकारून मंजूर करणें.

(२) डिव्हिडंड मंजूर करणें.

(३) आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कलम १०६ प्रमाणें धर्मप्रकाश एल. एस्. व्यंकाजीराव, रा. ब. गणेश गोपाळ शेंबेकर व श्री. अप्पासाहेब पंत हे आपल्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवरील जागा पाळी प्रमाणें खालीं करीत असून त्यांचे जागीं तीन डायरेक्टर्सची निवड करावयाची आहे. वरील जागा खालीं करणारे डायरेक्टर्स पुन्हां निवडून येणेंस पात्र असून ते त्या जागांसाठीं उभे आहेत.

(४) चालूं सालासाठीं ऑडिटर्सची नेमणूक करून त्यांचा तनखा ठरविणें.

(५) दि म्हैसूर ग्लास ॲन्ड एनामल वर्क्स लि., बंगलोर या कंपनीची मॅनेजिंग एजन्सी पुढें चालविण्याबाबत विचार करणें.

(६) या खेरीज ऐनवेळीं जी कामें चेअरमन सभेपुढें मांडतील त्यांचा विचार करणें.

कंपनीची शेअर ट्रान्स्फर बुकें ता. ११ ते २५ एप्रिल १९४८ अखेर दोन्ही दिवस धरून बंद राहतील.

ओगलेवाडी, (जि. सातारा) ता. १४ मार्च १९४८ — बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचे हुकुमावरून एस. पी. ओगले आणि कं. मॅनेजिंग एजंटस.

---

**सूचनाः**—डिव्हिडंड देण्याचें वार्षिक सभेंत मंजूर होतांच तें ज्यांचीं नांवे शेअर रजिस्टरवर ता. १० एप्रिल १९४८ ला दाखल आहेत; त्यांच्याकडे ता. १ जून १९४८ पासून मनिऑर्डर अगर इन्शुअरनें पाठविण्यास सुरवात होईल. तरी आपले पत्यांत कांहीं फेरबदल असल्यास तो कृपा करून ताबडतोब कळवावा.

---

# मुदलियार ॲंड मुदलियार

## बिझिनेस व सेल्स ऑर्गनायझर्स

**११५४ शंकरशेट रोड पुणें २.**

आम्हीं कोणत्याही मालाचा उठाव तुर्त महाराष्ट्र आणि कर्नाटक करितां गॅरंटीनें करून देऊं. सध्या डॉ. गोवंडे ज्वरबिंदू डेपो व मॉर लॅबोरेटरीज यांचें काम आम्हीं हातीं घेत आहोंत. चलाख व होतकरू तरुणांना आम्हीं कॅनव्हसिंगचें शिक्षण देऊन तयार करणार आहोंत.

## इंग्लंडमधील इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन

युद्धापूर्वी ब्रिटनमधील उद्योगधंदे, स्वतःला लागणारें भांडवल आपणच उभारीत असत. युरोपमधील युद्ध संपल्यानंतर इंग्लंडमधील बँका उद्योगधंद्यांना भांडवल पुरवूं शकतील कीं नाहीं, ह्याची चर्चा सुरू झाली. उद्योगधंद्यांना भांडवल पुरविण्यांत बँका आपला वाटा चांगल्या तऱ्हेनें उचलीत आहेत असें आतां दिसून आलें आहे. युद्ध संपल्यापासून ब्रिटिश बँकांनीं आपल्या गिऱ्हाइकांना १ अब्ज, २२ कोटी पौंड कर्जाऊ दिले आहेत. युद्धापूर्वी कर्जाऊ दिलेल्या जास्तींत जास्त रकमेपेक्षा हा आकडा २० कोटींनीं अधिक आहे. ह्यावरून ब्रिटिश बँका उद्योगधंद्यांना कर्जें पुरविण्यास तयार असल्याचें दिसून येते. तथापि लहान आणि मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांना कर्जाऊ रकम देण्याची बँकांची वृत्ती दिसत नाहीं. १६ वर्षांपूर्वी मॅकमिलन कमिटीनें ह्या गोष्टीकडे लक्ष वेधलें होतें. १९४५ मार्च अखेर मध्यें अशा धंद्यांना कर्जाची मदत करण्यासाठीं इंडस्ट्रिअल अँड कमर्शिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन करण्यांत आली. तिचे दोन भाग आहेत. तिचा मुख्य उद्देश लहान व मध्यम प्रतीच्या व्यापारी अगर औद्योगिक संस्थांना दीर्घ मुदतीची अगर मध्यम मुदतीचीं कर्जें पुरविण्याचा आहे. अशा उद्योगधंद्यांतून साधारणपणें ५। हजार ते २ लक्ष पौंडा पर्यंत कर्ज देण्याची सोय ही संस्था करून शकते. कॉर्पोरेशनच्या दोन वर्षांच्या कारकीर्दींत १ कोटी, ५ लाखांचीं कर्जें देण्यांत आलीं. कॉर्पोरेशनच्या दुसऱ्या वर्षीं तिला निव्वळ फायदा जवळ जवळ २४,००० पौंड झाला. कॉर्पोरेशन देत असलेल्या कर्जाऊ रकमांपैकीं ३५ टक्क्यांपेक्षा अधिक रकमा निरनिराळ्या प्रकारच्या भागाच्या भांडवली स्वरूपाच्या असतात. ह्यावरून पतीवर देण्यांत येणाऱ्या रकमांपैकीं बराच भाग भांडवली स्वरूपाचा असतो हे लक्षांत येईल. प्रत्यक्ष कर्जावरील व्याज ४ ते ५ टक्के असतें. कोणत्याही धंद्याला मदत देण्यापूर्वी कॉर्पोरेशन त्या धंद्याची परिस्थिति काळजीपूर्वक तपासते. अनुभव असा आहे कीं ज्या धंद्यांत मालकांच्या भांडवलापेक्षा बाहेरचा पैसा अधिक असतो त्याच धंद्यांकडून अगर व्यापारी संस्थांकडून कॉर्पोरेशनकडे मदतीची मागणी येते. कॉर्पोरेशनकडून निरनिराळ्या ५० प्रकारच्या धंद्यांना मदत करण्यांत आली आहे. तथापि त्यांतल्या-त्यांत स्थापत्य व खनिज धातूंच्या कारखान्यांना अधिक मदत दिली गेली आहे. दुसऱ्या वर्षी एकंदर कर्जापैकीं ३२ टक्के रकम कॉर्पोरेशननें ह्या धंद्यांसाठी दिली. कॉर्पोरेशनचे अधिकारी मुद्दाम हिंडून उद्योगधंद्यांना सल्लामसलत देत असतात. ही सल्लामसलत मदत दिलेल्या उद्योगधंद्यांना महत्त्वाची वाटेल असा संभव आहे.

दुसरी संस्था फिनॅन्स कॉर्पोरेशन फॉर इंडस्ट्री. ही विमा कंपन्या ट्रस्ट कंपन्या व बँक ऑफ इंग्लंड ह्यांच्या मालकीची आहे. ज्या उद्योगधंद्यांना स्वतःच्या उत्पन्नांतून नवीन यंत्रसामुग्री घेतां येत नाहीं आणि अगर आपली वाढ करतां येत नाहीं त्यांना फिनॅन्स कार्पोरेशनकडून मदत देण्यांत येते. पण ही मदत २ लाख पौंडांच्या पेक्षा जास्त लागणारी असली पाहिजे. कॉर्पोरेशनचें भांडवल व कर्ज उभारण्याचा अधिकार मिळून १२ कोटी, ५० लाखांची अंतिम मर्यादा आहे. कॉर्पोरेशनचा उद्देश भरमसाठ फायदा मिळविण्याचा नाहीं; तथापि त्याच्या भागीदारांना योग्य तो नफा मिळण्याची व्यवस्था ठेवली आहे. एखाद्या धंद्याच्या प्राथमिक अवस्थेंत कर्जावर बेताचें व्याज घेण्यांत येतें; आणि पुढें धंदा यशस्वी झाल्यावर जोखमीच्या मानानें अधिक व्याज घेण्याची तरतूदही ठेवलेली आहे.


**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

**★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★**

९६ नारायण पेठ, पुणें २.

दि

**बँक ऑफ इंडिया, लि.**

स्थापना १९०६

खपलेलें भांडवल :— २,००,००,०००.

वसूल झालेलें भांडवल :— १,५०,००,०००.

राखीव फंड :— २,००,००,०००.

मुख्य कचेरी :—ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

इतर शाखा :— मुंबईः— बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीकः—बांद्रे व अंधेरी. अहमदाबादः—भद्र (मुख्य शाखा), इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ता :—क्लाइव्ह स्ट्रीट (मुख्य शाखा), बडा बाजार व चौरंघी स्क्वेअर. नागपूरः—किंग्जवे व इतवारी बाजार. पुणेंः—लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज (कच्छ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

लंडन शाखा :— १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

न्यूयॉर्क एजंट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स :—सर कावसजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ., के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. मेडिस, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता.

चालू ठेवीचें खातें:—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. एकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटींवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

बी. एन्. अटल, एजंट, पुणें.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व